**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**विद्या परिषद निवडणूक-२०१७**

## जाहीर सूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३२(३)(छ) मधील तरतुदी अन्वये विद्या परिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन अध्यापक, त्यापैकी एक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) / भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल. सदहू तरतुदी अंतर्गत प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवावयाचे आहे. परंतु प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणा या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल अशी महिला असेल.

याकरिता मा.कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२(८) अंतर्गत निदेश क्र. ३४/२०१७, दिनांक ९.८.२०१७ मधील परिच्छेद १० अन्वये कार्यरिती विहित केली असून सदर निदेश विद्यापीठाच्या *www.sgbau.ac.in* या संकेतस्थळावरील **Election Portal** वर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३२(३)(छ) च्या तरतुदी अंतर्गत असणारे आरक्षण हे चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्याकरिता सदहू निदेशाच्या परिच्छेद १० मध्ये दिलेल्या कार्यरितीद्वारे पार पाडण्यास्तव मा. कुलगुरूंनी दिनांक **८ सप्टेंबर, २०१७** रोजी **दुपारी ३.०० वाजता**ची वेळ निश्चित केलेली आहे.

सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, चिठ्ठ्या टाकून काढावयाच्या सोडतीद्वारे आरक्षण निश्चित करण्याकरिता आपण **अधिसभागृह**, मुख्य प्रशासकीय इमारत, संत गाडगे बाबा अमरावती येथे नियोजित दिनांकास वेळेवर कृपया उपस्थित राहावे.

(डॉ. अजय प्र.देशमुख)
कुलसचिव तथा निर्वाचन अधिकारी
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ